
राजगड दर्शन



पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन



ब्रह्मऋषी तळे

राजगड दर्शन

राजगड दर्शन

लेखक

प्र. न. देशपांडे

एम्.ए., पीएच्.डी.

इतिहास विभाग, विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे

पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग

महाराष्ट्र शासन

१९८१

प्रकाशक
संचालक
पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग
महाराष्ट्र शासन, मुंबई

ऐतिहासिक स्थलदर्शनमाला–२

मुद्रक
व्यवस्थापक
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

मुखपृष्ठ : सुवेळा माचीचे बालेकिल्ल्यावरून दिसणारे दृश्य

चार शब्द

राजगड हे शिवाजीमहाराजांचे पहिले राजकीय केंद्र ! महाराजांनी स्वराज्याची स्थापना व विस्तार याच गडावरून केला. राजगड हा अतिशय दुर्गम व अभेद्य किल्ला असून मावळ भागात राजकीय हालचाली करण्यास शिवाजीमहाराजांना तो उपयुक्त ठरला. ह्या प्रेक्षणीय ऐतिहासिक स्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांना राजगडाची गौरवगाथा व त्याचे आजचे स्वरूप थोडक्यात समजावून घेणे शक्य व्हावे म्हणून प्रस्तुत पुस्तिकेचा प्रपंच !

शिवरायाची ३०० वी पुण्यतिथी ३१ मार्च १९८० रोजी रायगडावर साजरी झाली. त्या प्रसंगी प्रस्तुत पुस्तिका प्रसिद्ध व्हावी अशी योजना होती. परंतु काही अपरिहार्य अडचणींमुळे ते शक्य झाले नाही. ही पुस्तिका लिहिण्यासाठी पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. अ. प्र. जामखेडकर यांनी मला उद्युक्त केले, त्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करतो. हस्तलिखित तयार करण्याचे कामी सौ. विजया देशपांडे व कु. सुनंदा अहिरे ह्यांचे सहकार्य लाभले, त्याबद्दल त्यांना धन्यवाद !

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी हस्तलिखित वाचून काही मौलिक सूचना केल्या, त्याबद्दल त्यांचा ऋणी आहे.

ह्या पुस्तिकेचे वाचकांकडून आणि पर्यटकांकडून स्वागत होईल अशी अपेक्षा!

धुळे **प्र. न. देशपांडे**

निवेदन

छत्रपती श्रीशिवाजीमहाराजांचा महानिर्वाणाचा त्रिशतसांवत्सरिक सोहळा दिनांक ३१ मार्च १९८० रोजी किल्ले रायगडावर साजरा झाला. त्यानिमित्ताने 'रायगड' आणि 'राजगड' या दोन किल्ल्यांच्या पुस्तिकांचे प्रकाशन व्हावे, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभागाने त्यावेळी बरेच प्रयत्न केले, परंतु त्यावेळी ते शक्य झाले नाही.

धुळ्याचे डॉ. प्र. न. देशपांडे यांच्यावर लेखनाचे काम सोपविले होते. त्यांनी ते वेळेवर केले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. छापील पुस्तिकेची मुद्रणावस्थेतील प्रत, मी विनंती केल्यावरून, श्री. बाबासाहेब पुरंदरे यांनी वाचली व अभिप्राय दिला, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

अनेक शासकीय कामांचा व्याप असतानाही मुद्रणालयाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी पुस्तिकेची सुबक आवृत्ती काढल्याबद्दल त्यांचा, त्याचप्रमाणे विभागातील ज्या कर्मचाऱ्यांनी या पुस्तिकेच्या कामास हातभार लावला त्यांचाही मी आभारी आहे.

अ. प्र. जामखेडकर

मुंबई
शिवजयंती
५ मे १९८१

राजगड परिचय

राजगड हे शिवाजीमहाराजांचे पहिले राजकीय केंद्र. राजगड हा पुणे जिल्ह्यातील मावळ भागातील एक गिरिदुर्ग असून त्याचे स्थान १८°–१५' अक्षांश आणि ७३°–४१' रेखांश असे आहे. राजगड हा गुंजण मावळ प्रदेशात किंवा मुरुमखोऱ्यात सह्याद्रीच्या एका डोंगर-रांगेत असलेला किल्ला! या गडाचे मूळ नाव मुरुमदेव किंवा मुरुंबदेव असे होते. गुंजण मावळ भागाचे संरक्षण करण्यासाठी हा गड अतिशय मोक्याच्या ठिकाणी होता. पुणे भागाच्या दक्षिणेला डोंगराळ भागात असलेल्या या किल्ल्याचा शिवाजीमहाराजांना प्रारंभीच्या हालचालींसाठी फार उपयोग झाला.

मावळ भागामध्ये राज्यविस्तार साध्य करण्यासाठी राजगड आणि तोरणा हे दोन्ही किल्ले मोक्याच्या ठिकाणी होते. तोरणा किल्ला अभेद्य जरी असला तरी त्याचा बालेकिल्ला आकाराने लहान असल्यामुळे राजकीय केंद्र म्हणून हा किल्ला सोयीचा नव्हता. त्यामानाने राजगड अधिक दुर्गम असून त्याचा बालेकिल्लाही तोरण्याच्या मानाने आकाराने मोठा होता. शिवाय राजगडाकडे कोणत्याही बाजूने येताना एखादी टेकडी किंवा नदी ओलांडावीच लागते. एवढी सुरक्षितता होती म्हणून आपले राजकीय केंद्र म्हणून शिवाजीमहाराजांनी राजगडाची निवड केली.

राजगड किल्याचा आकार उंच, चिंचोळा, तीन पात्यांच्या पंख्याप्रमाणे असून या किल्ल्याला तीन माच्या आणि बालेकिल्ला आहे. बालेकिल्ला हा सर्वांत उंच असून समुद्रसपाटीपासून त्याची उंची १,३९४ मीटर आहे. या गडाला पद्मावती, सुवेळा आणि संजीवनी अशा तीन माच्या आहेत. पद्मावती माची समुद्रसपाटीपासून १,१९५ मीटर उंच असून सुवेळा आणि संजीवनी ह्या माच्याही थोड्याफार फरकाने पद्मावतीच्याच उंचीच्या आहेत.

राजगडाच्या वायव्येला ६.५ किलोमीटर अंतरावर तोरणा नावाचा किल्ला असून तो प्रचंडगड या नावाने प्रसिद्ध आहे. ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये

राजगडाच्या बरोबर तोरणा या किल्ल्याचाही वारंवार उल्लेख येतो. काही कागदपत्रातून राजगड, रोहिडा, तोरणा आणि सिंहगड या चार किल्ल्यांचा अनेकदा एकत्रित निर्देश आलेला आढळतो. कारण पुणे प्रदेशाच्या किंवा मावळ भागाच्या संरक्षणात्मक दृष्टिकोनातून या किल्ल्यांचे महत्त्व अधिक आहे. त्यातल्या त्यात राजगड आणि तोरणा हे दोन्ही किल्ले शिवाजीमहाराजांच्या प्रारंभीच्या हालचालींना अतिशय उपयुक्त ठरले. 'बुक ऑफ बॉम्बे' या ग्रंथाचा लेखक जेम्स डग्लस याने राजगड आणि तोरणा या किल्ल्यांच्या संदर्भात लिहिले आहे की, हे दोन्हीही गिरिदुर्ग अभेद्य स्वरूपाचे असून अशा ठिकाणी वसले आहेत की मावळ्यांचा नेता शिवाजी याला राज्यविस्तारासाठी या किल्ल्यांचा भरपूर उपयोग झाला.

औरंगजेबाचा एक अधिकारी साकी मुस्तैदखान याने फारसी भाषेत लिहिलेला 'मासिरे आलमगिरी' नावाचा ग्रंथ मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे एक उपयुक्त साधन आहे. औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीच्या वेळी साकी मुस्तैदखान दक्षिणेत आलेला होता. अनेक किल्ल्यांच्या वेढ्यांच्या वेळी तो स्वतः उपस्थित होता. त्याने राजगडाचे वर्णन आपल्या ग्रंथात दिलेले आहे: "राजगड हा अतिशय उंच. त्याची उंची पाहता तो सर्व किल्ल्यांत श्रेष्ठ होय असे म्हणता येईल. त्याचा घेर १२ कोसांचा आहे. त्याच्या मजबुतीची आणि उंचीची कल्पनाही करवत नाही. या डोंगराच्या दऱ्याखोऱ्यांतून आणि घनघोर अरण्यातून वाऱ्याशिवाय दुसरे काही फिरकू शकत नाही. येथे पावसालाच फक्त वाट मिळू शकते. इतर कोणीही त्यातून जाऊ शकत नाही."

"पूर्वी आदिलशाही सुलतानांच्या ताब्यात हा किल्ला होता. शिवाजीला या किल्ल्याचा ताबा मिळाला. त्याने या किल्ल्याच्या भोवती तीन तट बांधले. ते तट म्हणजे तीन किल्लेच म्हटले पाहिजेत. कोकणघाटाच्या माथ्याकडे सुवेळा व पद्मावती हे किल्ले आहेत. तळकोकणच्या बाजूने संजीवनी हा किल्ला आहे. शिवाजीने भक्कम तटबंदी करून इतरांना हा किल्ला जिंकून घेणे अशक्यच करुन सोडले. . . .

"किल्ल्याच्या लहान दरवाजापासून डोंगराच्या टोकापर्यंत दोन मजबूत तट बांधले होते. त्याचा आकार सोंडेसारखा असल्यामुळे त्यांना सोंड म्हणत.

शिवाजीने याप्रमाणे त्या तटांची रचना केली होती. या तटांच्या खाली भयंकर दऱ्या आहेत आणि अतिशय अवघड अशा वाटा आहेत. तेथून माणसे जाणे अशक्य आहे. . . . किल्ल्याचा बुरूज ३० गज उंच होता. फेब्रुवारी १७०४ मध्ये मुघलांच्या ताब्यात राजगड आला तेव्हा किल्ल्याचे नाव नबिशाहगड असे ठेवले."

महंमद हाशिम खाफीखान याने 'मुन्तखबुललुबाब-ए-महंमदशाही' नामक ग्रंथ १७३४ मध्ये लिहिला. मुघल साम्राज्याचा इतिहास हा या ग्रंथाचा विषय असून मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे तो एक महत्त्वाचे साधन गणला जातो. औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीच्या वेळी खाफीखान अनेक प्रसंगी मुघलांच्या छावणीत हजर होता. राजगडाविषयी तो लिहितो, "राजगड किल्ल्याचे मी कसे वर्णन करू? काय त्या किल्ल्याची उंची, काय त्याचा विस्तार! जणू काही आकाशच पसरले होते. त्याचे टोक पाहून छाती दडपे, त्याच्या भाराने पृथ्वी धारण करणारा पाताळातील वृषभ ओरडत असावा. त्या भागात सापांचा सुळसुळाट होता. जिकडे तिकडे निरनिराळ्या प्रकारचे हिंस्र पशू दिसत. त्यामुळे सगळे त्रस्त होऊन गेले. राजगड किल्ला म्हणजे डोंगरांची रांगच. त्याचा घेर बारा कोस होता. त्याला सगळीकडून वेढा घालणे कठीण होते."

संक्षिप्त इतिहास

राजगड हा शिवपूर्वकालातील किल्ला असून तो बहमनी राजवटीत 'मुरुमदेव' किंवा 'मुरुंबदेव' या नावाने ओळखला जात होता. या नावावरून तो मुस्लीमपूर्व काळात अस्तित्वात होता यात शंका नाही. इसवी सन १४९० च्या सुमारास अहमदनगरच्या निजामशाहीचा संस्थापक अहमद बहिरी याने बालेघाट तळ-कोकणातील महत्त्वाचे किल्ले जिंकून पश्चिम महाराष्ट्रात प्रभाव निर्माण केला. शिवनेरी, चावंड, लोहगड, तुंग, तिकोणा, कोंढाणा (सिंहगड), पुरंदर, भोरप इत्यादी किल्ले जिंकून घेतल्यानंतर अहमद बहिरी याने मुरुमदेव हा किल्लाही हस्तगत केला. मुरुमदेवचे गडकरी विनाशर्त शरण आल्यामुळे अहमद बहिरीला किल्ला जिंकण्यासाठी विशेष प्रयास करावे लागले नाहीत. 'बुऱ्हान-इ-मासिर' या फारसी साधनग्रंथात अशी माहिती मिळते की, अहमद बहिरी याने मुरुमदेव जिंकून घेतल्यावर तेथील मंदिरांचा व मूर्तींचा विध्वंस केला. मंदिरांच्या जागी मशिदी उभारल्या. किल्ल्यावर हवालदार आणि इतर अधिकारी नेमले.

मुरुमदेव गडावर निजामशाही सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर सुमारे १२५ वर्षे ह्या किल्ल्यावर कोणाचाही हल्ला झालेला दिसत नाही. येथे एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. बहमनी कालात गिरिदुर्गांचे महत्त्व झपाटयाने ओसरू लागले होते. बहमनी सत्तेचे विभाजन झाल्यावर शाही राज्यकर्त्यांनी राजकीय दृष्टया मोक्याच्या ठिकाणी असलेल्या मैदानी प्रदेशांत राजधान्या उभारल्या. अहमदनगर, विजापूर, गुलबर्गा, गोवळकोंडा, बिदर ही गावे शाही राज्यकर्त्यांना राजधानीसाठी सोयीची वाटली. त्यांनी तेथे भव्य किल्ले बांधले व शहरांना तटबंदी बांधून संरक्षणाची अप्रतिम व्यवस्था केली. डोंगराळ प्रदेशांतील गिरिदुर्ग राजकीय हालचालींसाठी विशेष सोयीचे राहिले नव्हते, त्यामुळे त्या काळात गिरिदुर्गांचे महत्त्व पंचक्रोशीतील प्रदेशांवर नियंत्रण ठेवण्यापुरते मर्यादित राहिले. निजामशाहीच्या रक्षणासाठी मलिक अंबर व शहाजी यांनी आदिलशाही व मुघल यांच्याविरुद्ध लढा उभारला, तेव्हा त्यांना गनिमी काव्यासाठी डोंगराळ प्रदेश उपयुक्त वाटू लागला. इसवी सन १६१० मध्ये मलिक अंबरने दौलताबाद या डोंगरी किल्ल्यापासून जवळच असलेल्या खडकी (औरंगाबाद) या गावी राजकीय केंद्र प्रस्थापित केले. तेव्हापासून डोंगरी किल्ल्यांना लष्करी व राजकीय दृष्टिकोनातून पुन्हा महत्त्व प्राप्त झाले.

इसवी सन १६२५ च्या सुमारास मुरुमदेव हा किल्ला निजामशाहीकडून आदिलशाहीकडे गेला. ही घटना एका कैफियतीवरून समजते. या कैफियतीची निश्चित तारीख उपलब्ध नसली तरी मलिक अंबरच्या हयातीत मुरुमदेव किल्ला निजामशाहीकडून आदिलशाहीकडे गेल्याचे यात स्पष्ट केले आहे. बाजी हैवतराव शिलिमकर व त्याचे वडील रुद्राजी नाईक हे निजामशाहीच्या वतीने मुरुमदेवची व्यवस्था पहात होते. आदिलशाही सरदार हैवतखान याने मुरुमदेव किल्ल्याला वेढा घातल्यानंतर बाजी हैवतरावने मलिक अंबरच्या आदेशानुसार किल्ला हैवतखानाच्या स्वाधीन केला.

परंतु आदिलशाहीची सत्ता मुरुमदेववर फार वर्षे टिकू शकली नाही. मावळ प्रदेशावर शहाजीचे प्रभुत्व असल्यामुळे त्याच्या राजकारणानुसार पुणे भागातील किल्ल्यांवर सत्तापालट होत असे. त्या दृष्टीने इसवी सन १६३० मध्ये मुरुमदेव पुन्हा निजामशाहीकडे कसा आला ते पाहण्यासारखे आहे. मुरुमदेव किल्ल्याचा कारभार शहाजीचा एक अधिकारी सोनजी हा पहात असताना, विजापूरच्या

एका सरदाराने किल्ल्यावर हल्ला केला. त्या वेळी झालेल्या चकमकीत सोनजी जखमी झाला. त्याचा मुलगा व शिबंदीतील काही लोक मारले गेले. तेव्हा बाळाजी नाईक शिलिमकर आपल्या लोकांनिशी मुरुमदेवच्या रक्षणासाठी धावून गेला. विजापूर सेनेशी झालेल्या चकमकीत बाळाजी नाईकही जखमी झाला. परंतु त्याने किल्ल्याचे मात्र रक्षण केले. आदिलशाही सरदाराने माघार घेऊन किल्ल्याचा वेढा उठवला. शहाजीने मानाची वस्त्रे देऊन बाळाजीचा आदर केला. ही घटना घडली तेव्हा स्वतः शहाजी आदिलशाही सोडून पुन्हा निजामशाहीकडे आला होता, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे.

शिवाजीमहाराजांच्या राजकीय हालचालींना नेमका केव्हा प्रारंभ झाला याविषयी अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. त्याचप्रमाणे मुरुमदेव शिवाजी-महाराजांच्या ताब्यात केव्हा आला याविषयीही भिन्न मते आढळतात. शिवचरित्र साहित्याच्या दहाव्या खंडामध्ये प्रसिद्ध झालेल्या एका पत्रात (पृष्ठ ५४) 'शिवाजीने शहामृग (?) नावाचा पर्वत ताब्यात घेऊन त्यावर इमारत बांधली. त्या पर्वताला राजगड हे नाव ठेवले' असा उल्लेख आलेला आहे. या नोंदीतील शहामृग पर्वत हे नाव अनोखे आहे. दुसऱ्या कोणत्याही कागदपत्रात मुरुमदेवला शहामृग असे नाव आढळत नाही. ओसाड डोंगरांना पुष्कळ वेळा स्थानिक नावे असतात. शहामृग हे अशा प्रकारे स्थानिक नाव असण्याची शक्यता आहे. परंतु नोंदीतील कालोल्लेख लक्षात घेतल्यास १६४२–४३ मध्येच शिवाजीमहाराजांनी मुरुमदेव (किंवा शहामृग) ताब्यात घेतला, असे म्हणावे लागेल. या काळात शिवाजीमहाराजांनी राजकीय हालचालींना सुरुवात केली होती असे दिसून येत नाही. एक गोष्ट मात्र खरी की शिवाजीमहाराजांनी राजकीय हालचालींना प्रारंभ केल्यावर सुरुवातीला जे किल्ले घेतले, त्यांमध्ये मुरुमदेव होता. सभासद बखरीमध्ये पुढील उल्लेख आढळतो: "मुरबाद म्हणोन डोंगर होता त्यास वसविले. त्याचे नाव राजगड म्हणोन ठेविले. त्या गडाच्या चार माच्या वसविल्या". सभासदाने बालेकिल्ला हीसुद्धा एक माचीच मानली असे म्हणावे लागेल.

३० मार्च १६४५ या तारखेचा एक कागद उपलब्ध असून तो राजवाडे खंड १५ मध्ये प्रसिद्ध झालेला आहे. हे पत्र नक्कल आहे. या पत्रात रोहिडखोरे व वेलवंडखोरे येथील देशपांडे व कुलकर्णी हे आदिलशहाशी बेइमानी करून शिवाजीला मदत करीत असल्याबद्दलची तक्रार मांडलेली आहे. याच पत्रात

शिवाजीमहाराजांनी मुरुमदेव ताब्यात घेऊन त्याचे नाव राजगड असे ठेवल्याचा उल्लेख आहे. हे पत्र बनावट असल्याचे मत बहुतेक अभ्यासकांनी व्यक्त केलेले आहे. विश्वसनीय कागदपत्रांचा विचार केल्यास इसवी सन १६४७ पूर्वी शिवाजीमहाराजांनी कोणताही किल्ला घेतला नसावा असे वाटते.

मार्च १६४७ मध्ये दादाजी कोंडदेवचा मृत्यू झाल्यावर शहाजीच्या जहागिरीची पूर्ण जबाबदारी शिवाजीमहाराजांवर आली. याच वर्षापासून त्यांनी किल्ले ताब्यात घेऊन राजकीय हालचालींना प्रारंभ केला. तोरणा आणि राजगड हे दोन्ही किल्ले शिवाजीमहाराजांनी इसवी सन १६४७ मध्ये घेतले असावेत. जेधे करिन्यातील उल्लेखावरून दादाजी कोंडदेवच्या मृत्यूनंतर तोरणा व राजगड हे किल्ले शिवाजीमहाराजांनी ताब्यात घेतल्याचे स्पष्ट होते.

मुरुमदेवला राजगड हे नाव ठेवण्यात शिवाजीमहाराजांनी औचित्य दर्शविले. हा किल्ला आपल्या राजधानीचे ठिकाण आहे असे स्पष्ट करण्यासाठीच महाराजांनी राजगड हे नाव ठेवले. खाफीखानाने दिलेल्या माहितीनुसार राजगड हे शिवाजीचे मुख्य केंद्र होते व तो या गडावर आपल्या नावाची नाणी पाडीत होता. आपले राज्य स्वतंत्र आहे हे आपल्या शत्रूंच्या निदर्शनास आणण्यासाठीच शिवाजीमहाराजांनी आपल्या राजधानीच्या किल्ल्याचे नाव राजगड ठेवले आणि स्वतःची नाणी पाडली.

इसवी सन १६४८–४९ मध्ये सामराज नीळकंठ रांझेकर याला शिवाजीने आपला प्रधान नेमले अशी माहिती एका पत्रात मिळते. त्यावरून शिवाजीने प्रधानमंडळाच्या व्यवस्थेला प्रारंभापासून सुरुवात केली होती, असे दिसून येते. इसवी सन १६५२ मध्ये राजगडावर शिवाजीसमोर काही वतनविषयक दावे किंवा तंटे चालत होते अशी माहिती एका पत्रावरून मिळते. केदारजी व खंडोजी खोपडे यांचा वतनविषयक तंटा चालू असताना बाबाजी शिवदेव सोनटक्के नावाच्या नोकराने दादाजी नरस प्रभु यांच्याऐवजी स्वतःचे नाव देशकुलकर्णी म्हणून घातले. या गुन्ह्याबद्दल बाबाजीला गुन्हेगार म्हणून शिक्षा देण्यात आली.

शिवाजीमहाराजांनी मुरुमदेव किल्ल्याचे नाव राजगड असे ठेवले असले तरी इसवी सन १६५७ मध्ये ह्या किल्ल्याचा उल्लेख मुरुमदेव म्हणूनच आलेला आढळतो. राजवाडे खंड १७ मध्ये एका पत्रात रुद्राजी व बाबाजी हैवतराव यांना पकडून मुरुमदेव गडावर बंदिस्त ठेवल्याचा उल्लेख आलेला आहे. त्याचप्रमाणे

विजापूरचा दुसरा अली आदिलशहा याच्या इसवी सन १६६० मधील एका फर्मानामध्ये विठोजी हैवतराव यास मुरुमदेवचा देसाई म्हणून संबोधले आहे. याचा अर्थ शिवाजीमहाराजांनी मुरुमदेवचे नाव राजगड जरी ठेवलेले असले तरी आदिलशहा आणि इतर सत्ताधीश हे नाव मान्य करण्यास तयार नव्हते.

इसवी सन १६६० मध्ये सिद्दी जोहरने पन्हाळ्यास वेढा घातला, त्या सुमारास जिजाबाई राजगडावर होती. पन्हाळ्याचा वेढा मोडून काढण्यासाठी नेताजी पालकर आणि सिद्दी हिलाल यांना जिजाबाईने राजगडावरून पाठविले. 'शिवभारता' मध्ये अशी माहिती मिळते की स्वत: जिजाबाई सिद्दी जोहरविरुद्ध चालून जाण्यासाठी तयार झाली होती. परंतु ऐनवेळी नेताजी पालकर राजगडावर आला. तेव्हा जिजाबाईने त्याला व सिद्दी हिलालला सिद्दी जोहरविरुद्ध पाठविले.

इसवी सन १६६० मध्ये औरंगजेबाच्या आज्ञेनुसार शाहिस्तेखानाने शिवाजी-महाराजांच्या प्रदेशावर स्वारी केली. फारसी साधनग्रंथांवरून अशी माहिती मिळते की शाहिस्तेखानाने राजगडाकडे फौज पाठविलेली होती. ह्या फौजेने राजगडाच्या जवळपासची काही खेडी जाळून पोळून उद्ध्वस्त केली. परंतु प्रत्यक्ष राजगड किल्ला जिंकण्याचा प्रयत्न मात्र केला नाही.

इसवी सन १६६२ मध्ये राजगडावरील इमारतींचे बांधकाम प्रगतिपथावर होते. १३ जुलै १६६२ चे एक पत्र उपलब्ध असून ते खुद्द शिवाजीमहाराजांचे आहे. या पत्रात आंबवड्याच्या बाजारात पंताजी पंडित आले असताना रायाजी देशमुखाने त्यांची मानहानी केली असा उल्लेख आहे. शिवाजीमहाराजांनी रायाजी देशमुखाला आणि त्याच्या साथीदारांना पंताजी पंडिताची माफी मागण्यासाठी बजाविलेले असून तसे न केल्यास राजगडावर त्यांना कैदेत ठेवून त्यांच्याकडून दगड वाहण्याचे काम करून घेण्यात येईल, अशी सक्त ताकीद दिलेली आढळते.

शाहिस्तेखानावर छापा घालून, म्हणजे ६ एप्रिल १६६३ रोजी शिवाजी-महाराज राजगडावर परतले.

इसवी सन १६६५ मध्ये मिर्झा राजा जयसिंगाने शिवाजीमहाराजांच्या प्रदेशावर स्वारी केली. आपल्या स्वारीची योजना आखताना जयसिंगाने शिवाजी-महाराजांच्या सर्व मुलखाची एकाच वेळी कोंडी करण्याचे तंत्र स्वीकारले. त्यानुसार दाऊदखान व रायसिंग ह्या दोघांबरोबर सैन्य देऊन त्यांना रोहिडा व

राजगड ह्या किल्ल्यांकडे पाठविले. दाऊदखान व रायसिंग यांनी राजगडाच्या परिसरातील अनेक गावे जाळून दहशत निर्माण केली. ३० एप्रिल १६६५ रोजी मुघल सैन्याने राजगडावर चाल केली. परंतु मराठ्यांनी किल्ल्यावरून विलक्षण मारा केल्यामुळे मुघलांना माघार घ्यावी लागली.

जून १६६५ मध्ये शिवाजीमहाराजांनी पराभव मान्य करून जयसिंगाबरोबर तह केला. ह्या घटनेचा राजगडावरील शासन व्यवस्थेवर परिणाम झाला असावा. राजगडावर स्वत: शिवाजीमहाराज नाहीत, हवालदार व सरनोबतही नाहीत या संधीचा फायदा घेऊन राजगडाचा सबनीस केसो नारायण ह्याने अफरातफर केली. शिवाजीमहाराजांनी केसो नारायणला कोणती शिक्षा दिली हे समजण्यास मार्ग नाही.

शिवाजीमहाराजांनी जयसिंगाबरोबर तह करताना २३ किल्ले मुघलांना देण्याचे मान्य केले व स्वत:कडे १२ किल्ले ठेवले. या १२ किल्ल्यांत राजगड व तोरणा या दोन्ही किल्ल्यांचा समावेश होता. जे १२ किल्ले शिवाजीमहाराजांनी स्वत:कडे ठेवले त्यांची यादी त्यांनी फार काळजीपूर्वक केलेली होती. राजगडाजवळच तोरणा असल्यामुळे तो मुघलांना देण्याचे त्यांनी टाळले. त्याचप्रमाणे रायगडाजवळ असलेला लिंगाणागडही देण्याचे महाराजांनी टाळले. राजगड, तोरणा, लिंगाणा आणि रायगड हे एकाच माळेतले चार किल्ले स्वत:कडे ठेवण्यात शिवाजीराजांचे चातुर्य दिसून येते.

शिवाजीमहाराज आग्र्याहून निसटून निवडक लोकांनिशी १२ सप्टेंबर १६६६ ला राजगडला सुखरूप पोचले. मात्र संभाजी २० नोव्हेंबर १६६६ ला राजगडला पोचला. त्याला कृष्णाजी विश्वासराव यांनी मोठ्या चतुराईने राजगडापर्यंत पोचविले. कृष्णाजी विश्वासराव याचेबरोबर त्याची आई व काशी त्रिमल हे होते. शिवाजीमहाराजांनी त्यांच्या या कामगिरीबद्दल भरपूर बक्षीस दिले. जेधे शकावलीमध्ये मात्र असा उल्लेख आहे की, '२० नोव्हेंबर १६६६ या दिवशी (मार्गशीर्ष शुद्ध पंचमी, शके १५८८) शिवाजीमहाराज संभाजीसहवर्तमान राजगडावर आले'.

२४ फेब्रुवारी १६७० रोजी राजगडावर राजारामाचा जन्म झाला. राजगडावर जन्मला म्हणूनच शिवाजीमहाराजांनी आपल्या मुलाचे नाव राजाराम ठेवले असावे असे वाटते.

सिंहगड किल्ला घेण्यासाठी शिवाजीमहाराजांनी तानाजी मालुसरे यास राजगडावरूनच १६७० मध्ये पाठविले. तानाजी मालुसरेने आत्माहुती देऊन ४ फेब्रुवारी १६७० रोजी सिंहगड जिंकून घेतला. ही बातमी महाराजांना राजगडावर समजली. सिंहगड राजगडाच्या ईशान्येस १७ किलोमीटर अंतरावर आहे. सिंहगड मराठ्यांच्या ताब्यात आल्यावर खण (गंज) पेटवून मोठा जाळ करण्यात आला. हा जाळ म्हणजे किल्ला जिंकण्याची खूण. त्यामुळे राजगडावर महाराजांना विजयाची वार्ता त्वरित समजली.

इसवी सन १६७१–७२ मध्ये शिवाजीमहाराजांनी रायगड हे स्थान राजधानीसाठी निश्चित केले. तरीपण राजगडाच्या नव्या बांधकामाकडे किंवा दुरुस्तीकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. इसवी सन १६७१ मधील एका पत्रातील उल्लेखाप्रमाणे राजगडावरील बांधकामासाठी शिवाजीमहाराजांनी दहा हजार होन मंजूर केले अशी माहिती मिळते.

३ एप्रिल १६८० रोजी शिवाजीमहाराजांचे निधन झाल्यावर रायगडावर गृहकलह निर्माण झाला. संभाजी सत्तेवर स्थिरस्थावर होईपर्यंत स्वराज्यावर औरंगजेबाच्या स्वारीचे संकट कोसळले (मार्च १६८२). सात वर्षे संभाजीने दाद दिली नाही. परंतु कवी कलशच्या मदतीसाठी तो रायगडाहून पन्हाळ्याकडे गेला व तेथून परत येताना संगमेश्वरजवळ मुघलांच्या तावडीत सापडला. औरंगजेबाने ११ मार्च १६८९ रोजी संभाजीला वढू कोरेगाव येथे ठार मारले. संभाजीच्या वधानंतर औरंगजेबाने मराठ्यांचे किल्ले जिंकून घेण्यासाठी निकराचे प्रयत्न सुरू केले. अनेक महत्त्वाचे गड मुघलांनी जिंकून घेतले. किशोरसिंह हाडा या मुघल सरदाराने जून १६८९ मध्ये राजगड जिंकून घेतला. औरंगजेबाने अबुलखैरखान याला राजगडाचा अधिकारी म्हणून नेमले. अबुलखैरखानाची मराठ्यांनी फजिती कशी केली त्याची मनोरंजक माहिती खाफीखानाने आपल्या 'मुन्तखबुललुबाव' नावाच्या ग्रंथात दिलेली आहे.

'अबुलखैरखान यास राजगडाची किल्लेदारी देण्यात आली होती. अद्याप संभाजीला पकडल्याची बातमी पसरली नव्हती. मराठ्यांची फौज राजगडाभोवती गोळा झाली. त्यांनी आपल्या बळाचे प्रदर्शन करून अबुलखैरखानास किल्ला खाली करून देण्यास सांगितले. फिरोजजंगाचे सैन्य जवळपास होते तरी तो नालायक आणि हलका माणूस (अबुलखैरखान) घाबरला. मराठ्यांच्या

तावडीतून सुटणे कठीण आहे असे त्याला वाटले. म्हणून त्याने आपले व बायका-मुलांचे जीवदान मागितले. रात्रीच्या वेळी तो किल्ल्याबाहेर पडला. काही बायका दोन तीन डोल्यांतून होत्या. काही पायी चालत होत्या. त्यांच्याबरोबर जडजवाहिर, कपडेलत्ते इत्यादींच्या संदुका आणि पेटारे होते. मराठे चहूकडे होतेच. त्यांनी त्याला पूर्णपणे लुबाडले आणि त्याची व त्याच्या कुटुंबियांची खूप फजिती केली. अशा स्थितीत तो मध्यरात्रीच्या सुमारास फिरोजजंगाच्या छावणीत पोहोचला. आपल्या नादानपणाचा त्याला पश्चात्ताप होऊन तो दुःख करू लागला. बादशहाला हे कळताच त्याने त्याला बडतर्फ करून जबरदस्तीने मक्केच्या यात्रेला पाठविले (**मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध**—सेतुमाधवराव पगडी, पृष्ठ २३).

खाफीखानाने मराठ्यांच्या विजयाचे कारण स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, संभाजीला पकडल्याची बातमी अद्याप पसरलेली नव्हती. वास्तविक पाहता संभाजीला पकडल्यानंतर मार्च १६८९ मध्ये औरंगजेबाने वढू कोरेगाव येथे त्याला ठार मारले होते. राजगडावरील लोकांना ही बातमी समजली नव्हती, असे म्हणणे योग्य वाटत नाही. संभाजीच्या वधामुळे मराठ्यांचे नीतिधैर्य ढासळले, असा मथितार्थ खाफीखानाच्या लिखाणावरून निघतो. परंतु वस्तुस्थिती अशी होती की संभाजीचा औरंगजेबाने क्रूरपणे वध केल्यामुळे मराठे विलक्षण संतप्त झाले होते व त्यांनी मुघलांचा पराभव करण्याचा निर्धार केला होता.

३ जुलै १६९० च्या एका पत्रामध्ये मराठ्यांनी प्रचंडगड किंवा तोरणा मुघलांकडून जिंकून घेतला असा उल्लेख आलेला आहे. याच पत्रामध्ये रामचंद्रपंत अमात्यांनी राजगड आणि सिंहगड जिंकून घेण्याविषयी उत्तेजन दिलेले आढळते. याचाच अर्थ मुघलांनी जिंकून घेतलेले किल्ले परत मिळविण्यासाठी मराठ्यांनी शर्थीचे प्रयत्न चालविले होते.

मराठा राज्याचा सूत्रधार राजाराम जिंजीला गेल्यानंतर औरंगजेबाने महाराष्ट्रात आणि कर्नाटकात एकाच वेळी मराठ्यांविरुद्ध मोहीम उभारली. परंतु राजाराम कर्नाटकात असतानाही महाराष्ट्रात रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचिव इत्यादी मुत्सद्द्यांनी मुघलांचा यशस्वीपणे प्रतिकार केला. जानेवारी १६९४ मधील एका पत्रात शंकराजी नारायण सचिव याने 'कानद खोऱ्याच्या देशमुखांनी राजगडाच्या परिसरातील प्रदेशाचे मुघलांच्या

हल्ल्यापासून संरक्षण केले. म्हणून त्यांची इनामे त्याजकडे चालवावीत', असा आदेश दिलेला आहे. इसवी सन १६९७ मध्ये छत्रपती राजाराम जिंजीच्या वेढ्यातून निसटून महाराष्ट्रात परत आला. मुघलांविरुद्ध लढा देण्यासाठी त्याने राजगड हेच मुख्य केंद्र केले. राजारामाच्या मृत्यूनंतरही राजगडचे महत्त्व कमी होऊ शकले नाही. शंकराजी नारायण सचिव याचे ४ ऑगस्ट १७०१ चे पत्र शिवसाहित्याच्या तिसऱ्या खंडात प्रसिद्ध झाले आहे. या पत्रावरून त्या सुमारास पद्मावती माचीसाठी शहाजी मोहिते नावाचा हवालदार होता, अशी माहिती मिळते. परंतु त्यानंतर मुघलांनी राजगड किल्ला जिंकून घेतला असावा. तथापि १७०३ च्या सुमारास पुन्हा राजगड मराठ्यांनी जिंकून घेतलेला आढळतो. याचा अर्थ असा की मुघलांनी मोठ्या प्रयासाने राजगड किल्ला जिंकल्यावर मराठे अल्पावधीतच या किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित करीत. गदाधर प्रल्हाद शकावलीमध्ये ११ नोव्हेंबर १७०३ या दिवशी स्वतः औरंगजेब राजगडला वेढा घालण्यासाठी पुण्याहून निघाला अशी माहिती मिळते. हा किल्ला १८ फेब्रुवारी १७०४ मध्ये तह करून औरंगजेबाने जिंकून घेतला. साकी मुस्तैदखानाच्या 'मासीर-ए-आलमगिरी' या ग्रंथात राजगड मुघलांच्या ताब्यात कसा आला याची सर्व माहिती दिलेली आहे. या माहितीप्रमाणे २८ नोव्हेंबर १७०३ रोजी मुघल सैन्य राजगडाच्या पायथ्याशी येऊन पोहोचले. पद्मावती माचीच्या बाजूने मीर-आतीश-तरबियतखान आणि हमीदुद्दीनखान बहादूर यांच्या नेतृत्वाखाली मुघल सैन्याने हल्ला केला. किल्ल्यासमोर एका उंच टेकडीवर मुघलांनी दमदमा बांधला आणि तेथून किल्ल्यावर तोफांचा मारा सुरू केला. १६ फेब्रुवारी १७०४ रोजी किल्लेदार मुघलांना शरण आला. हमीदुद्दीनखान आणि तरबियतखान यांची मनसब वाढविण्यात आली. किल्ल्याचे नाव 'नबिशहागड' असे ठेवण्यात आले. रुहल्लाहखान यालाही मौल्यवान, रत्नजडित शिरपेच देऊन त्याचा सत्कार करण्यात आला. मुघलांचा राजगडाभोवती वेढा चालू असताना मराठ्यांनी किल्ल्याच्या संरक्षणासाठी शर्थीचे प्रयत्न केले. सुवेळा माचीजवळ मुघलांशी लढत असताना संताजी शिलिमकर आणि सिदोजी थोपटे तोफेचा गोळा लागून ठार झाले.

१६ फेब्रुवारी १७०४ रोजी मुघलांनी राजगड जिंकून घेतल्यावर औरंगजेबाने अनेक सरदारांना राजगडाची किल्लेदारी पत्करण्याविषयी विचारणा केली.

परंतु डोंगराळ भागात असलेल्या या किल्ल्यावर अधिकारी म्हणून राहण्यास कोणीही तयार होईना. शेवटी इरादखान नावाचा सरदार राजगडाचा किल्लेदार म्हणून राहण्यास तयार झाला तेव्हा औरंगजेबाने त्याला मोठे बक्षीस दिले. शिवाय त्याला व त्याच्या मुलासाठी दोन घोडे, त्याच्या भावासाठी पाच घोडे आणि दोनशे बैल वाहून नेऊ शकतील एवढे धान्य राजगडाकडे पाठविण्यात आले. इरादखान फार दिवस राजगडाचा किल्लेदार म्हणून राहिला नाही. पुढे औरंगजेबाने मनसूरखान याला किल्लेदार म्हणून पाठविले.

२९ मे १७०७ या दिवशीच्या एका पत्रामध्ये गुणाजी सावंत याने पंताजी शिवदेवाबरोबर राजगडावर स्वारी करून तो किल्ला जिंकून घेतला अशी माहिती दिलेली आहे. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठा-मुघल संघर्ष संपला. शाहूची मुघलांच्या कैदेतून सुटका झाली. महाराष्ट्रात परत आल्यावर ताराबाईशी संघर्ष करून शाहूने बहुतेक किल्ले जिंकून घेतले. शाहू आणि ताराबाई यांचा संघर्ष रोहिडा किल्ल्यावर असलेल्या शंकराजी नारायण सचिव याला धक्कादायक वाटला. त्याने प्राणत्याग केला. तेव्हा शाहूने सचिवांच्या कुटुंबियांचे सांत्वन करून शंकराजीचा मुलगा नारोशंकर याला सचिवपद दिले. रोहिडा घेतल्यानंतर शाहूने तोरणा व राजगड हे दोन्ही किल्ले हस्तगत केले. शाहूच्या ताब्यात राजगड आल्यानंतर त्याच्या व्यवस्थेसाठी काही खर्च होत असावा असे १७०९ च्या पत्रावरून स्पष्ट होते. सुवेळा माचीस ३०० रुपये व संजीवनी माचीसाठी १०० रुपये अशी व्यवस्था केल्याचा उल्लेख वरील पत्रात आढळतो. पद्मावती माची व बालेकिल्ला यांचा उल्लेख मात्र या पत्रात आलेला नाही.

मुघल-मराठा संघर्ष संपल्यानंतर दक्षिणेतील राजकारणात फार मोठा बदल घडून आला. शाहूच्या प्रेरणेने बाळाजी विश्वनाथने मराठा मंडळाची स्थापना केली. दिल्लीच्या बादशहाकडून बाळाजी विश्वनाथने शाहूच्या नावाची सनद आणि त्याचप्रमाणे दक्षिणेतील सहा मुघली सुभ्यांच्या चौथाई महसुलीचे अधिकार मिळविले. १७२० नंतर मराठा मंडळाचा विस्तार उत्तर भारतात आणि दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात झाला. सातारा ही शाहूची राजधानी झाली तर पुणे हे पेशव्यांचे केंद्र झाले. या काळात गिरिदुर्गांचे महत्त्व झपाट्याने ओसरू लागले. तरीपण प्रत्येक किल्ल्यावर ठराविक शिबंदी ठेवण्यात येत असे. मोहिमेच्या प्रसंगी किल्ल्यावरील शिबंदीला मदतीसाठी बोलाविले जात असे.

उदाहरणार्थ विशाळगडाच्या मोहिमेसाठी छत्रपती शाहूने राजगडाची शिबंदी बोलाविली होती.

पेशवे काळात राजगड हा सचिवांच्या ताब्यात होता. पेशवाईमध्ये आर्थिक परिस्थिती वारंवार विघडत असल्याने किल्ल्यावरील अधिकाऱ्यांचे व शिबंदीचे पगारही वेळेवर होत नसत. राजगडावरील सेवकांचे पगार एक वर्षभर थकले होते अशी माहिती राजवाडे खंड १२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका पत्रावरून मिळते. इंग्रजी अमदानीतही राजगड किल्ला पंत सचिवांच्या ताब्यामध्ये होता. इसवी सन १९४७ मध्ये भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भोर संस्थान भारतामध्ये सामील झाले. त्याचबरोबर राजगडावरील संस्थानिकांचा हक्क संपुष्टात आला.

राजगड हा भोर संस्थानाच्या ताब्यात असताना तेथे व्यवस्था पाहण्यासाठी सहा अधिकारी नेमले होते. त्यामध्ये मुख्य हवालदार भोसले कुळातील असे. सुवेळा माचीसाठी सरनोबत शिलिमकर घराण्यातील असे. पद्मावती माचीसाठी सरनोबत पवार घराण्यातील असे; तर संजीवनी माचीसाठी सरनोबत खोपडे घराण्यातील असे. याशिवाय सरनाईक आणि नाईक असे दोन अधिकारी असत. त्यांच्या दिमतीसाठी चार शिपाई आणि एक हरकाम्या नेमलेला असे.

□ □

राजगड दर्शन


मार्ग

राजगडाला जाण्यासाठी अनेक मार्ग आहेत. पुण्यापासून राजगड ५० किलोमीटर अंतरावर असल्यामुळे हा गड पाहणाऱ्यांना पुण्याला येणे सोयीचे पडते. पुण्यापासून नसरापूर-वेल्हे रस्त्याने राजगडला जाता येते. नसरापूर-वेल्हेपर्यंत एस. टी. गाड्यांची सोय आहे. मार्गासनी नावाच्या गावाजवळ उतरून गुंजवणे या गावापर्यंत पायी जावे लागते. गुंजवणेच्या दक्षिणेस दीड किलोमीटर अंतर चालून गेल्यावर राजगडाच्या पायथ्यापर्यंत जाता येते. दुसरा मार्ग म्हणजे नसरापूर-वेल्हे मार्गाने पाबेगावच्या ओढ्याजवळ उतरावे लागते. तेथून कानदी नदी आणि खरीव खिंड पार करून ५ किलोमीटर अंतरावर असलेल्या वाजेघर गावापर्यंत जावे लागते. या गावापासून पिंपरी व पाली अशी दोन लहान गावे ओलांडून राजगडाच्या पायथ्यापर्यंत जाता येते. तिसरा एक मार्ग मळे नावाच्या गावापासून आहे. भाटघरच्या धरणातून होडीमधून या गावापर्यंत येता येते. त्यामुळे हा मार्ग मोठा रोमहर्षक आहे. दर मंगळवारी भोरच्या बाजारासाठी धरणाच्या पाण्यातून होड्या चालतात. मळे ह्या गावास पोहचल्यानंतर सुवेळा माचीच्या बाजूने राजगडावर चढण्यासाठी मार्ग उपलब्ध होतो.

मार्गाची दुर्गमता

राजगड किल्ल्याला तीन माच्या असून त्या सर्वांची समुद्रसपाटीपासूनची उंची जवळजवळ समान आहे. सुवेळा माची ही आग्नेय दिशेला असून समुद्रसपाटीपासून १,१८३ मीटर उंचीवर आहे. तर संजीवनी माची नैऋत्येला असून समुद्रसपाटीपासून १,१८५ मीटर उंच आहे. तिसरी माची पद्मावती ही समुद्रसपाटीपासून १,१९५ मीटर उंच असून बालेकिल्ला हा किल्ल्याचा सर्वांत उंच भाग आहे. बालेकिल्ल्याची उंची समुद्रसपाटीपासून १,३९४ मीटर उंच आहे.


बालेकिल्ल्याला जाण्याचा मार्ग पद्मावती माची ओलांडून असल्यामुळे ही माची अधिक महत्त्वाची मानली जात होती. पद्मावती माचीकडे जाण्यासाठी



विझर गावातून राजगडाचे दृश्य

सदर, दारूखाना, घोड्यांच्या पागा, राजवाडा यांचे दृश्य







पाली
दरवाजा-१



पाली
दरवाजा-२

संजीवनी माची





बालेकिल्ला दरवाजा

जननी मंदिर



दोन प्रवेशद्वारे असून त्यांची नावे अनुक्रमे पाली दरवाजा आणि गुंजवणे दरवाजा अशी आहेत. पाली दरवाजाकडे जाणारा मार्ग वेल्हे या गावापासून असून हे गाव पुण्यापासून ५६ किलोमीटर अंतरावर आहे. या गावापासून प्रथम पाबे नावाच्या लहान गावापर्यंत जावे लागते. तेथून कानदी नदी आणि खरीव नावाची खिंड ओलांडून वाजेघर या लहान गावापर्यंत येता येते. तेथून गडाची प्रत्यक्ष चढण सुरू होते. पद्मावती माचीकडे जाणारा हा मार्ग नैसर्गिक दृष्टया अतिशय सुरक्षित असून या बाजूने शत्रूला गडाकडे येणे अवघड आहे. कारण एका बाजूने कानदी नदी असून दुसऱ्या बाजूने खरीव खिंड आहे. खिंडीच्या कडांचा मारा करण्यासाठी परकोटाप्रमाणे उपयोग करता येतो. कानदी नदीला पावसाळ्यात पाणी रहात असल्यामुळे या भागातून गडाकडे जाणे दुरापास्त होते. पद्मावती माचीच्या मार्गाला निसर्गाचे संरक्षण लाभलेले आहे. शिवाय या माचीकडे जाणारा रस्ता सरळ चढणाचा असून इतर डोंगरी किल्ल्यांप्रमाणे वळणावळणाचे रस्ते येथे नाहीत. त्यामुळे हा सरळ चढणीचा रस्ताही दमछाक करणारा आहे. असे जरी असले तरी पाली दरवाजापर्यंत येणारा रस्ता हा बराच रुंद असून मध्ययुगामध्ये या रस्ताने हत्ती, घोडे यांसारखे प्राणीही किल्ल्यावर आणले जात. हा सरळ चढणीचा रस्ता संपल्यानंतर पाली किंवा पश्चिम दरवाजा लागतो. या दरवाजाकडे येणाऱ्या जिन्यामुळे एक परकोट तयार झाला असून गडाकडे येणाऱ्या शत्रूवर मारा करता येणे शक्य होते.

पद्मावती माचीकडे येण्यासाठी दुसरा मार्ग म्हणजे मार्गासनी-गुंजवणे मार्ग. या मार्गाने गुंजवणे प्रवेशद्वारातून राजगड किल्ल्याला येता येते. मार्गासनी हे गाव नसरापूर-वेल्हे या रस्त्यावर असून तेथून गुंजवणे या गावापर्यंत पायी यावे लागते. या मार्गाने येत असताना कानदी आणि गुंजवणी या दोन नद्या ओलांडाव्या लागतात. हे लक्षात घेतल्यास गुंजवणे प्रवेशद्वाराकडे वाटचाल करणे शत्रूलाही अवघड होते हे सांगण्याची आवश्यकता नाही. शिवाय या बाजूने प्रत्यक्ष गडाची चढण ही इतकी सरळ, उंच व कठीण आहे की सतत तोल सावरीत गड चढावा लागतो. शिवाय किल्ला अर्धा चढून वर आल्यावर खडकात खोदलेल्या अरुंद पायऱ्यांची एक वाट आहे. या वाटेने गडाची चढण चढणे आणखी कठीण ! ही दुर्गमता लक्षात घेतल्यावर गुंजवणे मार्गाने पद्मावती माचीकडे जाणे किती अवघड ठरते याची कल्पना येईल. राजगडाच्या या दुर्गमतेची

शिवाजीमहाराजांना पूर्ण कल्पना होती आणि म्हणूनच राजधानीसाठी त्यांनी हा किल्ला निश्चित केला.

गडाकडे येण्यासाठी तिसरा एक मार्ग असून मळे या गावापासून या मार्गाने जाता येते. या मार्गाने जाण्यासाठी भाटघर धरणाच्या पाण्यातून नावेमधून काही अंतर यावे लागते. मळे गावाला आल्यानंतर राजगडाला जाण्यासाठी दोन रस्ते उपलब्ध होतात. एक म्हणजे कालेश्वरी किंवा दिंडी दरवाजाने सुवेळा माचीकडे जाता येते. दुसरा मार्ग म्हणजे आळू दरवाजाने संजीवनी माचीकडे जाता येते. परंतु हे दोन्ही मार्ग दऱ्याखोऱ्यांतून जात असल्यामुळे राजगडाकडे जाण्यास अत्यंत अवघड आहेत. थोडक्यात राजगडाकडे जाणारे सर्व मार्ग दुर्गम असून मध्ययुगामध्ये शत्रूला या किल्ल्यावर हल्ला करणे दुरापास्त होते. राजगडाकडे कोणत्याही बाजूने येण्यासाठी एखादी नदी किंवा एखादी टेकडी ओलांडावी लागते. याचाच अर्थ राजगडाला चारही बाजूंनी निसर्गाचे संरक्षण लाभले आहे.

राजगडाच्या माच्या

राजगड किल्ल्याच्या माच्या ह्या स्वतंत्र किल्ले म्हणून गणल्या गेलेल्या आढळतात. साकी मुस्तैदखानाने राजगडाच्या तीन्ही माच्यांना तीन किल्ले मानलेले आहेत. तो लिहितो, ' शिवाजीने राजगड किल्ल्याच्या भोवती तीन तट बांधले. ते तट म्हणजे तीन किल्लेच म्हटले पाहिजे '. सभासदाने राजगडाविषयी म्हटले आहे, ' शिवाजी-महाराजांनी मुरबाद म्हणोन डोंगर होता त्यास वसविले. त्याचे नाव राजगड म्हणून ठेविले. त्या गडाच्या चार माच्या वसविल्या.' सभासदाने बालेकिल्ला हीसुद्धा एक माची मानली असावी. राजगडावरील तीन्ही माच्यांची नावे अनुक्रमे सुवेळा, संजीवनी आणि पद्मावती अशी आहेत. सुवेळा आणि संजीवनी माची ह्या पद्मावती माचीपासून स्वतंत्र करण्यासाठी पद्मावती माचीला आतील बाजूस तटबंदी बांध-लेली आहे. त्याचे कारण असे की राजगडाचा प्रवेश प्रामुख्याने पद्मावती माचीकडून असून बालेकिल्ल्यालाही याच माचीवरून जाता येते. त्यामुळे संजीवनी आणि सुवेळा या दोन्ही माच्या सुरक्षित करण्यासाठी पद्मावती माचीच्या दक्षिणेस पूर्व-पश्चिम तट बांधला आहे. या आतील तटबंदीसही दरवाजे असून गडावरील लोकांना संपर्क साधण्यासाठी या दरवाजांचा उपयोग होत असे. पद्मावती माचीला अधिक संरक्षण देण्याचे मुख्य कारण म्हणजे या माचीवर महाराजांची सदर, धान्याचे कोठार आणि इतर महत्त्वाच्या लष्करी इमारती होत्या.

सुवेळा माची

मुरुमदेव किल्ला ताब्यात आल्यानंतर शिवाजीमहाराजांनी किल्ल्याच्या पूर्वेकडील माचीला भरभक्कम तटबंदी बांधून, या माचीचे नाव सुवेळा असे ठेवले. पूर्वेकडे ही माची असल्यामुळे उगवत्या सूर्याचे दर्शन या माचीवरून होते, म्हणून तिचे नाव सुवेळा असे ठेवले. तेथे एक मजेदार संदर्भ घेता येण्यासारखा आहे. रामायण या महाकाव्यात ज्या अनेक किल्ल्यांचे उल्लेख आलेले आहेत त्यांमध्ये सुवेळा हे एका किल्याचे नाव आहे. शिवाजीमहाराजांनी कदाचित रामायणातील ह्या नावाचा आपल्या राजधानीच्या पहिल्या माचीला नाव देण्याचा उपक्रम केला असावा. सुवेळा माची ही संजीवनी माचीएवढी लांब नाही आणि प्रचंडही नाही. सुवेळा माचीचे तीन टप्पे असून ही माची पूर्वेकडे चिंचोळी होत गेलेली आहे. माचीला प्रारंभी एक छोटी टेकडीवजा जागा असून तिला ' डुबा ' असे म्हणतात. या भागात झाडी-झुडपांची दाटी आहे. ह्या डुब्याचा भाग ओलांडून पुढे गेल्यावर इमारतींचे काही अवशेष आढळतात. तानाजी मालुसरे, येसाजी कंक, शिलिमकर, सरनौबत इत्यादी अधिकाऱ्यांच्या घरांचे हे अवशेष आहेत. प्रत्येक घराला लागून पाण्याची स्वतंत्र व्यवस्था केलेली आढळते. हे घरांचे अवशेष ओलांडून पुढे गेल्यावर माचीचा खरा तटबंदीचा भाग सुरू होतो. येथील तटबंदी दोन टप्प्यांत असून प्रत्येक टप्प्याच्या शेवटी चिलखती बुरूज आहेत. पहिल्या टप्प्याचा बुरूज अतिशय बुलंद असून त्याच्या भरभक्कम पायऱ्या आजही मजबूत स्थितीत आहेत. दुसऱ्या टप्प्यात गेल्यावर तटबंदीच्या दोन्ही बाजूंस आतील अंगास भुयारी चिलखती परकोटाची रचना केलेली आहे. अशा प्रकारची रचना संजीवनी माचीलाही आढळते. या दुसऱ्या टप्प्याकडे जाताना एक उंच खडक असून त्या खडकात सुमारे तीन मीटर व्यासाचे आरपार छिद्र आहे. फार दुरून अंतरावरून राजगड पाहताना ते छिद्रही दिसू शकते. सुवेळा माचीच्या पहिल्या टेकडीवजा भागात आग्नेय दिशेस पाण्याच्या काही टाक्या आणि रामेश्वराच्या मंदिराचे काही अवशेष आहेत. या रामेश्वर मंदिरात शिवलिंग, भग्न नंदी, एक स्त्री मूर्ती व एक यक्षासारखी पुरुष मूर्ती अशी शिल्पे आहेत. प्रा. ग. ह. खरे यांच्या मते ही यक्षमूर्ती वीरभद्राची असावी किंवा द्वारपालाची असावी. या मूर्तीची तुलना प्रा. ग. ह. खरे यांनी आग्नेय आशियातील सयाम, सुमात्रा, जावा या देशांत सापडणाऱ्या हिंदू मूर्तींशी केली आहे. रामेश्वर मंदिराच्या वरील बाजूस एका

शिलाखंडावर गणपतीची प्रतिमा असून या मंदिराच्या एका कोनाड्यात गणपती, पार्वती, शिवलिंग या प्रकारची शिल्पे आहेत. हे रामेश्वर मंदिर व इतर मंदिरे शिवकालात बांधली गेली होती किंवा त्यापूर्वीही अस्तित्वात होती हे निश्चित सांगणे अवघड आहे. निजामशाही घराण्याचा संस्थापक महंमद बहिरी याने इसवी सन १४९० च्या सुमारास राजगड ऊर्फ मुरुमदेव हा किल्ला जिंकून घेतला तेव्हा त्याने राजगडवरील मंदिरांचा नाश केला अशी माहिती आढळून येते. कदाचित या प्रसंगी रामेश्वर व इतर मंदिरांचा नाश झालेला असावा. तटबंदीच्या दोन्ही टप्प्यांना बाहेरील बाजूस परकोट असून तेथून शत्रूवर मारा करण्यासाठी झरोके ठेवलेले आहेत. दुसऱ्या टप्प्याला बाहेरील बुरुजांना आतील बाजूस दुसरे बुरूज बांधून संरक्षण दिलेले आहे. अशा बुरुजांना चिलखती बुरुज असे म्हणतात. सुवेळा माचीच्या तटबंदीला असलेल्या १७ बुरुजांपैकी ७ बुरुजांना चिलखती बुरुजांची सोय आहे. या चिलखती बुरुजांमुळे तटबंदीला संरक्षण मिळते. शत्रूंनी तोफांचा मारा करून बाहेरील बुरूज भग्न केल्यास या आतील बुरुजांचा तटाप्रमाणे उपयोग होतो. मागे उल्लेखिलेल्या भुयारी परकोटाप्रमाणे हे चिलखती बुरूज हे राजगडाच्या लष्करी स्थापत्याचे वैशिष्टच मानले पाहिजे. दुसऱ्या टप्प्यात असलेला भुयारी परकोट हा बाहेरील तटबंदीपासून सुमारे अर्ध्या मीटर अंतरावर आहे. या भुयारी परकोटातून बाहेरील तटबंदीकडे येण्यासाठी दिंड्याची योजना केलेली आहे. या भुयारी मार्गातून किल्ल्यावरील सैनिकांना बाहेरील तटाच्या भिंतीतील खालच्या बाजूस असलेल्या मारा करण्याच्या जागेपर्यंत पोहोचता येते. अशा प्रकारे राजगडाच्या ह्या पहिल्या माचीची संरक्षण-व्यवस्था शिवाजीमहाराजांनी उत्तम प्रकारे साध्य केली होती.

संजीवनी माची

सुवेळा माचीच्या रचनेनंतर शिवाजीमहाराजांनी संजीवनी माचीच्या तटबंदीचे काम पूर्ण केले. या माचीलासुद्धा तीन टप्पे असून माचीची लांबी २.५० किलोमीटर आहे. सुवेळा माचीप्रमाणे संजीवनी माचीची तटबंदी भरभक्कम केलेली आढळते. या माचीच्या प्रत्येक टप्प्याच्या शेवटी पश्चिमेकडील टोकास भरभक्कम बुरूज बांधलेले आहेत. संजीवनी माचीच्या पठारावर काही घरांचे अवशेष आणि इतर इमारतींचे अवशेषही दिसून येतात. या माचीच्या प्रत्येक टप्प्यास चिलखती बुरुजांची व्यवस्था केलेली आढळते. या माचीवर

पाणीपुरवठ्यासाठी अनेक टाक्या बांधलेल्या होत्या. या माचीला एकंदर १९ बुरूज असून त्यांपैकी ९ बुरुजांना चिलखती बुरुजांची जोड दिलेली आहे. सुवेळा माचीप्रमाणे याही माचीला भुयारी परकोटाची योजना केलेली असून त्यायोगे संरक्षणव्यवस्था साध्य केली आहे. हा भुयारी परकोट संजीवनी माचीच्या तिसऱ्या टप्प्यामध्ये असून या भुयारातून बाहेरील तटबंदीकडे येण्यासाठी दिंड्यांची व्यवस्था केलेली आहे. या भुयारी परकोटाचा एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे किल्ल्यावरील शिबंदीला त्यामध्ये लपून राहता येते. शत्रूने जर समजा किल्ला हस्तगत केला आणि शत्रूचे सैन्य माचीवर चढून आले तर या भुयारी परकोटातून बाहेर येऊन शत्रूवर मारा करता येणे शिबंदीला शक्य होत असे. संजीवनी माचीमध्ये प्रवेश करण्यासाठी आळू नावाचा दरवाजा असून मळे या गावापासून गड चढून या दरवाजापर्यंत येता येते. या वाटेत तुटलेले कडे असल्याने रस्ता अतिशय विकट आहे.

पद्मावती माची

राजगडाच्या तिन्ही माच्यांपैकी पद्मावती माचीला वैशिष्टचपूर्ण स्थान आहे. कारण पद्मावती माची हे केवळ लष्करी केंद्र नसून प्रत्यक्ष राजाच्या निवासाचे ठिकाणही होते. या माचीवर मोठ्या राजवाड्यांच्या भग्न चौथऱ्यांचे अवशेष सापडतात. पद्मावती माचीच्या बांधकामासाठी ४ वर्षे लागली. इसवी सन १६६३ मध्ये या माचीची तटबंदी पूर्ण झाली अशी माहिती समकालीन कागदपत्रांमध्ये मिळते. इतर दोन माच्यांप्रमाणे पद्मावती माचीलाही भक्कम तटबंदी बांधलेली असून परकोटाची उत्कृष्ट रचना केलेली आढळते.

गुंजवणे दरवाजा

पद्मावती माचीला येण्यासाठी दोन मार्ग असून गुजवणे आणि पाली अशी ह्या मार्गांची नावे आहेत. मार्गासनी-गुंजवणे मार्गाने पद्मावती माचीकडे येता येते. गुंजवणे नावाचे लहान गाव राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेले आहे. मार्गासनीकडून या गावाकडे जाताना कानदी आणि गुंजवणी या दोन नद्या ओलांडाव्या लागतात. प्रत्यक्ष किल्ल्याची चढण अत्यंत अवघड असून माचीवर जाण्यासाठी सरळसोट कडा चढून जावा लागतो. ज्या ठिकाणी हा कडा चढण्यास अशक्यप्राय आहे तेथे खडकात कोनाड्याच्या आकाराच्या पायऱ्या खोदून ठेवल्या आहेत. त्यावरून हा मार्ग किती बिकट आहे याची कल्पना येते.

गुंजवणे दरवाजा म्हणजे एकामागे एक असलेल्या तीन प्रवेशद्वारांची एक मालिका आहे. ह्यातील पहिल्या प्रवेशद्वाराचे स्थापत्य अत्यंत साधे असून कोणत्याही प्रकारच्या आकृती किंवा नक्षी कोरलेल्या नाहीत. एका लाकडी दरवाजाच्या काही अवशेषांवरून या प्रवेशद्वाराला ४.५० मीटर उंच व १.३५ मीटर रुंद असा लाकडी दरवाजा असावा असे अनुमान निघते. या प्रवेशद्वाराला दोन्ही बाजूंनी भरभक्कम बुरूज असून उजव्या बाजूस तटबंदी बांधलेली आहे. डाव्या बाजूस खडकावर साधारणत: १०.६ मीटर उंचीची एक भिंत बांधलेली आहे. तटबंदीला मारा करण्यासाठी छिद्रे ठेवलेली आहेत. गुंजवणे दरवाजाचे दुसरे प्रवेशद्वार पहिल्या प्रवेशद्वारापासून १७ मीटर अंतरावर आहे. या प्रवेश-द्वाराला वैशिष्ट्यपूर्ण कमान आहे. या कमानीवर एक नमुनेदार शिल्प कोरलेले आढळते. या शिल्पाविषयी प्रा. ग. ह. खरे लिहितात, 'या दरवाजाच्या शेवटी व गणेशपट्टीच्या खाली दोन्हीकडे दोन उपडे घट घेतलेल्या व एका कमलकलिके-समोर असलेल्या सोंडा आहेत. बौद्ध वाङमयात बुद्धाचा जन्म होताच तो व त्याची आई यावर दोन हत्तींनी अनुक्रमे उष्ण व थंड पाण्याचा अभिषेक केला असे सांगितले आहे. पण प्राचीन काळी बुद्धाची मूर्ती करीत नसल्याने हा प्रसंग चित्रित करण्यासाठी केवळ तो व त्याची आई, उत्फुल्ल कमल व दोन्ही बाजूंस सोंडा वर केलेले व त्यात घट घेतलेले दोन हत्ती एवढा प्रसंग दाखवित. या प्राचीन शिल्पातूनच सध्याचे श्री किंवा गजलक्ष्मी शिल्प तयार झाले अशी कल्पना आहे. घट धारण केलेल्या ह्या दोन सोंडा श्री–शिल्पाचे अवशेष आहेत. शिवाजीमहाराजांच्या डोक्यात ह्या जुन्या सांस्कृतिक महत्त्वाच्या शिल्पाचा अंशत: आविष्कार करण्याची कल्पना आली हे त्यांच्या प्रतिमेस योग्य असेच आहे'. प्रस्तुत शिल्प हे प्रा. खरे यांच्या मताप्रमाणे मायादेवी किंवा गजलक्ष्मी या देवतेचे असले तरी शिवाजीमहाराजांनी हे शिल्प कोरून घेतले असावे असे वाटत नाही. कारण शिवाजीमहाराजांच्या दुसऱ्या कोणत्याही किल्ल्यावर अशा आकृत्या आढळत नाहीत. शिवाय प्रवेशद्वारावर श्री किंवा गजलक्ष्मी यांची आकृती कोरण्याची कल्पना सातव्या-आठव्या शतकामध्ये प्रचारात होती. अनेक कोरीव लेण्यांच्या प्रवेशद्वारांवर गजलक्ष्मीची प्रतिमा कोरलेली आढळते. या प्रवेशद्वाराचे एकूण स्वरूप लक्षात घेतल्यास याची रचना शिवपूर्वकालातच झालेली असली पाहिजे असे वाटते. विशेषत: पाली दरवाजाचे बांधकाम लक्षात घेतल्यास एक अतिशय वेगळ्या स्वरूपाचे प्रवेशद्वार गुंजवणे बाजूस बांधण्याचे

महाराजांना काहीही प्रयोजन नव्हते. पाली दरवाजाच्या प्रवेशद्वारावर मारा करण्यासाठी आवश्यक त्या जागांची सोय केलेली आहे; तर उपरिनिर्दिष्ट दरवाजावर मारा करणाऱ्या जागांची सोय नाही. दुसऱ्या गुंजवणे प्रवेशद्वारावर पुष्कळ उंचीवर एकच छिद्र ठेवलेले आढळते. हे सारे स्थापत्यविशेष लक्षात घेतल्यास हे दुसरे प्रवेशद्वार शिवपूर्वकालातच केव्हातरी बांधलेले असावे असे म्हणता येईल. याचाच अर्थ हा किल्ला राष्ट्रकूट किंवा चालुक्य या राजवटीतील असला पाहिजे. आणखी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की शिवाजी-महाराजांनी हा किल्ला घेण्यापूर्वी त्याचे अस्तित्व होते. शिवाय त्याचे नावही मुरुमदेव होते. त्यावरून हा किल्ला मुस्लिम–पूर्वकालातील असला पाहिजे, असे अनुमान निघते. गजलक्ष्मीच्या शिल्पाचा शिवाजीमहाराजांच्या धोरणाशी बादरायणी संबंध जोडणे योग्य वाटत नाही.

या प्रवेशद्वाराच्या आतील दोन्ही बाजूंस सुमारे दीड मीटर उंचीच्या खोल्या द्वाररक्षकांसाठी बांधलेल्या आढळतात. दुसऱ्या प्रवेशद्वारातून काही अंतर चालून गेल्यानंतर आणि खडकात कोरलेल्या व भग्नावस्थेत असलेल्या पायऱ्या ओलांडून गेल्यानंतर गुंजवणे दरवाजाचे तिसरे प्रवेशद्वार लागते. हे प्रवेशद्वार आज पूर्णतः भग्नावस्थेत आहे. हे तिसरे प्रवेशद्वार ओलांडल्यानंतर पद्मावती माचीत प्रवेश करता येतो.

पाली दरवाजा

पाली दरवाजाचा मार्ग वेल्हे ह्या गावापासून उपलब्ध होतो. वेल्हे हे गाव पुण्यापासून ५६ किलोमीटर अंतरावर आहे. या गावापासून पाबे नावाच्या गावापर्यंत जावे लागते. तेथून कानदी नदी व खरीव खिंड ओलांडून वाजे गावापर्यंत येता येते. वाजे गावापासून किल्ल्याच्या चढणीला प्रारंभ होतो. या बाजूनेही किल्ल्याची चढण सरळसोट उंच असल्याने अवघड आहे. परंतु पाली दरवाजाकडे जाण्यासाठी प्रशस्त रस्ता या डोंगरामध्ये तयार केलेला आहे. पाली दरवाजाला दोन प्रवेशद्वारे आहेत.

पहिले प्रवेशद्वार हे भरपूर उंचीचे आणि रुंदीचे असून अंबारीसह हत्ती या दरवाजातून जाऊ शकतील एवढे ते भव्य आहे. या प्रवेशद्वाराला दोन्ही बाजूंस बुलंद बुरूज बांधलेले असून त्यांच्या योगे दरवाजाचे संरक्षण साध्य केलेले आहे. इथे बारकाईने पाहिल्यास असे दिसून येते की दरवाजासमोरील खडकाचा

वराच भाग पायऱ्या खोदण्यासाठी उपयोगात आणलेला आहे. हे प्रवेशद्वार ओलांडून सुमारे २०० मीटर अंतर चालून आल्यावर दुसरे प्रवेशद्वार लागते. या प्रवेशद्वाराला टोकदार कमान (Pointed Arch) असून प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंस भरभक्कम बुरूज आहेत. ह्या बुरुजांच्या वरील बाजूस मारा करण्यासाठी छिद्रे ठेवलेली आहेत. ह्या दरवाजाचे लष्करी स्थापत्याच्या दृष्टीने एक वैशिष्टय म्हणजे दरवाजावर आणि बुरुजावर जे परकोट बांधलेले आहेत त्या परकोटांना गोल आकाराचे झरोके (फालीका) ठेवलेले आढळतात. अशा झरोक्यांच्या दोन्ही अंगांस कमलपत्रांच्या आकारांचे 'अर्धदल' (लपण्याची जागा) बांधलेले आहेत. या गोल 'फालिकांचा' उपयोग तोफा डागण्यासाठी होत असे. शिवाय परकोटाच्या खालील बाजूस लहान आकाराची छिद्रे असून त्यांतून मारा करता येणे सहज शक्य होते. प्रवेशद्वारावर मध्यभागी एक चौकोनी खिडकी ठेवलेली असून बहुधा दरवाजा बंद असताना पहारा करण्यासाठी या खिडकीचा उपयोग होत असावा. आणखी एक मजेदार वैशिष्टय म्हणजे टोकदार कमानीच्या वरील बाजूस राजमुकुटाच्या आकाराची आकृती कोरलेली आहे. याचा अर्थ आपण स्वतंत्र राजे आहोत ते स्पष्ट करण्यासाठी शिवाजीमहाराजांनी अशा प्रकारची आकृती हेतुपुरस्सर कोरून घेतली असावी. दुसऱ्या दरवाजातून बाहेर पडल्यावर रस्ता एकदम डाव्या बाजूस वळतो. उजव्या बाजूस द्वाररक्षकाची खोली असून या जागेतून, दरवाजातून आत येणाऱ्या शत्रूवर टेहळणी करता येते; तर डाव्या हाताला असलेल्या द्वाररक्षकाच्या खोलीतून किल्ल्यामध्ये जाणाऱ्या रस्त्यावर नियंत्रण ठेवता येते. ही योजना लक्षात घेतल्यास पद्मावती माचीच्या संरक्षणासाठी किती खबरदारी घेतली होती याची कल्पना येऊ शकते.

बालेकिल्ला

राजगड किल्ल्याचा शिरोभाग म्हणजे बालेकिल्ला होय. हा सर्वांत उंच असून समुद्रसपाटीपासून १,३९४ मीटर उंचीवर आहे. बालेकिल्ल्याला जाणारा रस्ता अत्यंत कठीण आणि खूप अरुंद आहे. ज्या टेकडीवर बालेकिल्ला बांधलेला आहे ती टेकडीच मुळी निमुळती, सरळ व उंच असल्यामुळे बालेकिल्ल्याची चढण अत्यंत अवघड झाली आहे. बालेकिल्ल्याच्या चढणीला खडकात कोरलेल्या पायऱ्या असून एका बाजूस अतिशय खोल दरी आहे. उजव्या बाजूस भिंतीसारखा कडा आहे. त्यामुळे ह्या अरुंद रस्त्याने जाताना गड चढण्याचा

सराव नसलेल्या लोकांना घावरल्यासारखे होते. दरीच्या वाजूस सुरक्षिततेसाठी लोखंडी गज लावलेले आहेत. तरीपण हा मार्ग एवढा अरुंद आणि वाजूस असलेली अक्राळ-विक्राळ दरी यांमुळे गड चढणाऱ्यास भय वाटते. त्यावरून शिवकालामध्ये हा किल्ला विशेषत: वालेकिल्ला जिंकून घेणे किती अवघड होते याची कल्पना येण्यासारखी आहे. चढण संपल्यानंतर वालेकिल्ल्याचा दरवाजा लागतो.

वालेकिल्ल्याचा दरवाजा आजही चांगल्या अवस्थेमध्ये आहे. दरवाजाला टोकदार कमान असून दोन्ही वाजूंस अष्टकोनी भरभक्कम बुरूज बांधलेले आहेत. या प्रवेशद्वाराला लाकडी दरवाजा होता. त्याच्या खुणा मात्र आज दिसतात. शिवाय आतील वाजूस अडसर घालण्यासाठी दोन्हीही अंगांस पोकळ जागा ठेवलेल्या दिसून येतात. या प्रवेशद्वाराची उंची ५.४० मीटर असून रायगडाच्या वालेकिल्ल्याला असलेल्या प्रवेशद्वाराप्रमाणे याही प्रवेशद्वाराला दोन्ही वाजूंस इस्लामी पद्धतीची तावदाने आहेत. प्रवेशद्वारावर कमळ, स्वस्तिक यांसारखी शुभचिन्हे कोरलेली आहेत.

वालेकिल्ला हा सरळ चढणीच्या टेकडीवर बांधलेला असला तरीही तो अधिक दुर्गम करण्यासाठी १.५० मीटर उंचीची तटबंदी भोवती बांधण्यात आलेली आहे. ह्या तटबंदीला विशिष्ट अंतरावर बुरूजही ठेवलेले आहेत.

दरवाजातून वालेकिल्ल्यात प्रवेश केल्यानंतर दोन लहान मंदिरे दृष्टीस पडतात. डाव्या अंगास जननीदेवीचे देऊळ असून काही अंतर चालून गेल्यावर ब्रह्मऋषींचे मंदिर दृष्टीस पडते. जननी मंदिरामध्ये देवीची मूर्ती नसून शिवलिंग आहे. जरी हे मंदिर भग्नावस्थेत असले तरी तेथे पूजा-अर्चा होत असते. दुसरे मंदिर चौकोनी आकाराचे असून या मंदिरात कोणतेही विशेष स्थापत्य आढळत नाही. ब्रह्मऋषींच्या मंदिराच्या मागे एक सरळ रस्ता दक्षिणोत्तर जात असून ह्या रस्त्याच्या दोन्ही अंगांस दुकाने होती. रायगडाप्रमाणेच राजगडावरही वाजारपेठ वसलेली होती. अर्थात राजगडाची वाजारपेठ आकाराने लहान असून दुकानांची संख्याही त्या मानाने कमी होती. वालेकिल्ल्यावरील ह्या वाजारपेठेचे भग्न अवशेषच आज उपलब्ध आहेत. त्या मानाने रायगडावरील वाजारपेठेचे अवशेष चांगल्या स्थितीत असून ती वाजारपेठ अधिक प्रशस्त व नमुनेदार आढळून येते. राजगडावरील वाजारपेठेच्या उणिवा लक्षात घेऊन

शिवाजीमहाराजांनी रायगडावर अधिक निर्दोष अशी बाजारपेठ वसविली. राजगडावरील बाजारपेठेला दोन्ही अंगांस प्रत्येकी ५ ते ६ दुकाने असून मधोमध जाणारा रस्ता ४.५० मीटर रुंद आहे. रायगडाप्रमाणेच येथील बाजारपेठेतही प्रत्येक दुकानाला दोन खोल्या असून दर्शनी खोली विक्री केंद्र व आतील खोली भांडार म्हणून वापरण्यात येत असे. प्रस्तुत वास्तू बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध असली तरी काही अभ्यासकांच्या मते ही वास्तू बाजारपेठेची नसून येथे सैनिकांची घरे असावीत. कारण बालेकिल्ला हा सर्वसामान्यपणे आणीबाणीच्या वेळी आश्रयासाठी वापरला जात असे. त्यामुळे अशा ठिकाणी बाजारपेठेची रचना असंभवनीय ठरते असे अनुमान काही अभ्यासकांनी काढलेले आहे. सांप्रत काळात राजगडावरील तथाकथित बाजारपेठ भग्नावस्थेत असून, उपलब्ध असलेल्या किरकोळ अवशेषांवरून ही वास्तू नेमकी कोणती असावी हे निश्चित करणे अवघड आहे.

बालेकिल्ल्यावरील बहुतेक सर्व इमारती भग्नावस्थेत आहेत. १० मीटर लांब आणि ३.२५ मीटर रुंद असलेल्या चौथऱ्यावर एक इमारत उभारलेली असावी. कदाचित ही इमारत म्हणजे शिवाजीमहाराजांचे निवासस्थान असावे. ब्रह्मऋषी मंदिराजवळ खडकात खोदलेली एक पाण्याची टाकी असून बालेकिल्ल्यावरील पाणीपुरवठ्यासाठी या टाकीचा उपयोग होत असावा. ह्या मुख्य टाकीशिवाय आणखी दोन तळी राजगडाच्या बालेकिल्ल्यावर होती.

राजगडाची शासनव्यवस्था

स्वराज्याची स्थापना केल्यावर राजगड हे शिवाजीमहाराजांनी आपले मुख्य केंद्र केले. एका अर्थाने शिवाजीमहाराजांची ही पहिली राजधानी होय. मुख्य राजकीय केंद्र असल्याने राजगडावर शिवाजीमहाराजांचे प्रत्यक्ष नियंत्रण होते. तथापि शासकीय सोयीसाठी वेगवेगळ्या प्रकारची खाती चार मुख्य अधिकाऱ्यांना वाटून देण्यात आली होती. हे चार अधिकारी म्हणजे सरनोबत, हवालदार, कारखानीस आणि सबनीस. शिवाजीमहाराजांच्या काळात हे चार अधिकारी गडाची व्यवस्था पहात होते. एका समकालीन कागदपत्रावरून शहाजी मोहिते नावाचा हवालदार शिवकालामध्ये पद्मावती माचीची व्यवस्था पहात होता असे दिसून येते. हवालदाराप्रमाणे पद्मावती माचीवर सरनोबत नावाचा अधिकारीही काम करीत असे. एका कागदपत्रावरून असे दिसते की सरनोबताच्या जोडीला

सवनीस हा अधिकारी माचीवर काम करीत असे. केसो नारायण नावाच्या सवनिसाने हवालदार आणि सरनोबत या अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत काही भ्रष्टाचार केला अशी माहिती एका पत्रात आलेली आहे. त्यावरून असे दिसते की हवालदार व सरनोबत गडावर नसत. त्यावेळी कारभार पाहण्याचे कार्य सवनीस करीत असावा.

राजगड किल्ला हे मुख्य केंद्र असल्याने वरील चार अधिकाऱ्यांशिवाय आणखी काही दुय्यम अधिकारीही होते. शिबंदीही भरपूर होती. गडावरील मंदिरांच्या देखभालीसाठी ब्राह्मणांची नेमणूकही केली जात असे. शिवकालातील एका कागदपत्रावरून असे दिसते की त्र्यंबकेश्वर गोसावी नावाचा ब्राह्मण गडावरील धार्मिक कार्ये करीत होता. त्यासाठी त्याला ७५ रुपये वर्षासन देण्यात आलेले होते. गडावर धार्मिक उत्सव होत असावेत असे वाटते. काही वर्षांपूर्वी जननीच्या मंदिरापुढे बकरी, कोंबडी यांचे बळी दिले जात असत. बालेकिल्ल्याच्या खाली रेड्यांचे बळीही दिले जात. अर्थात शिवकालामध्ये ह्या प्रथा अस्तित्वात होत्या किंवा नाही हे सांगणे अवघड आहे.

□ □

राजगडाच्या परिसरात

राजगडाच्या परिसरात आणखी एक शिवकालीन प्रसिद्ध किल्ला तोरणा किंवा प्रचंडगड हा काही किलोमीटर अंतरावर आहे. पुणे-नसरापूर-वेल्हे रस्त्याने वेल्हे गावापर्यंत आल्यानंतर तोरणा किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत पोहोचता येते. शिवाजीमहाराजांनी स्वराज्यकार्य सुरू केल्यानंतर प्रारंभी जे काही किल्ले जिंकले त्यामध्ये राजगड आणि तोरणा या दोन्ही किल्ल्यांचा समावेश होता. हा किल्लाही शिवपूर्वकालातील असून बहमनी काळातील कागदपत्रांमध्ये या किल्ल्याचा उल्लेख आढळतो. इसवी सन १६४७ च्या सुमारास राजगडावरोवर तोरणा हा किल्लाही शिवाजीमहाराजांच्या ताब्यात आला असावा. ग्रँड डफ याच्या मताप्रमाणे शिवाजीमहाराजांनी तोरण्याच्या आदिलशाही किल्लेदाराला वश करून घेतले आणि आपली सत्ता त्या किल्ल्यावर प्रस्थापित केली. इसवी सन १६४९ मध्ये विजापूरचा सरदार फत्तेखान शिवाजीविरुद्ध चालून आला. त्या सुमारास राजगड आणि तोरणा या दोन्ही किल्ल्यांवर आवश्यक त्या इमारती शिवाजीमहाराजांनी बांधल्या असाव्यात. जेधे करिन्यामध्ये असा उल्लेख मिळतो की "स्वामींनी किले राजगड, तोरणा या किलियावर इमारतीचे काम लाविले. किले तयार करविले त्यावर फत्तेखानची फौज विजापुरीहून पुणे देशात आली."

तोरणा किल्ल्याच्या भोवती सात मेटे होती. मेटे याचा अर्थ पहारा करण्याच्या विशिष्ट जागा. या मेटयांची नावे उपलब्ध नाहीत. तथापि वाघदारे, भट्टी, पीलवरे, वरलीपेठ, भुरुक अशी काही नावे आजही सांगितली जातात. या मेटांवर पहारा करण्याचे काम कोळी लोकांकडे होते. तोरणा अथवा प्रचंडगड हा किल्ला राजगडाप्रमाणे उंच असून समुद्रसपाटीपासून त्याची उंची १,४०३ मीटर आहे. गडावर जाण्याचा मार्ग दुर्गम असून या किल्ल्याला झुंजार व बुधला अशा दोन माच्या आहेत. झुंजार माची आकाराने लहान असली तरी या माचीवर गडावरून आणि पायथ्याकडून दोन्ही बाजूने अवघड चढण आहे. संरक्षणाच्या दृष्टीने ही माची नावाप्रमाणे झुंजार आहे. बुधला ही माची तीन किलोमीटर लांबीची आहे. या माचीवर बुधल्याच्या आकाराचा उंचवटा मध्येच असून त्या उंचवटयाच्या


बुधल्यासारख्या आकारामुळे या माचीस बुधला माची असे नाव मिळाले. उंचवटचापासून दक्षिणेकडे जो फाटा जातो त्या फाटचावरून सरळ राजगडाकडे जाणारा मार्ग आहे. पश्चिमेकडील फाटचापासून कोकणचा परिसर दृष्टीस येतो. झुंजार माचीस दोन टप्पे असून प्रत्येक टप्प्यास चिलखती बुरूज आहेत. तोरण्याचा बालेकिल्ला लहान आकाराचा असल्यामुळे माथ्यावर प्रशस्त मैदान नाही. तथापि हा बालेकिल्ला खूप उंचीवर असल्यामुळे तेथून सिंहगड, प्रतापगड, रायगड, मकरंदगड हे किल्ले दूरवर दिसू शकतात. बालेकिल्ल्यावर मेंगाई देवीचे देऊळ आहे. तिच्या दक्षिणेस एका दिवाणघराचे अवशेष आहेत तर उजव्या बाजूस तोरणेश्वर महादेवाचे देऊळ आहे. या महादेवाच्या देवळाजवळ एक दीपमाळ असून वीरगळाचे काही दगड बाजूस ठेवलेले आहेत. बालेकिल्ल्यावर महार टाके, थिवथिवा, टकमक बुरूज, मेंगाई टाके, भेल बुरूज इत्यादी अवशेष आहेत. झुंजार माचीवर सदरेच्या इमारतींचे अवशेष दिसून येतात. बुधला माचीवर अनेक अवशेष असून त्यांपैकी महत्त्वाच्या वास्तू पुढीलप्रमाणे : विशाळा, खांब व कापूर टाके, गंगजाई मंदिर, दारूखाना, भगत दरवाजा, शिवगंगा, पाताळगंगा, वेताळ, महाळुंगे टाके, महारवाडा, कोकण दरवाजा, दिंडी बुरूज, चिणला दरवाजा, सदर, वळंजाई सुरुंग, वळंजाई दरवाजा, चित्ता दरवाजा इत्यादी.


□ □

संदर्भ ग्रंथ

1. वि. वा. जोशी—राजधानी रायगड, पुणे, १९२९.
2. ग. ह. खरे—स्वराज्यातील तीन दुर्ग, पुणे १९२९.
3. D. V. Kale—*Here came Swaraj*, Bhor, 1966.
4. A. R. Kulkarni—"Rajgad" the First Capital of Shivaji, Dr. A. G. Pawar Felicitation Volume, Kolhapur, 1968.
5. P. N. Deshpande—*Maratha Forts,* A thesis submitted to Poona University for Ph.D. degree, 1972.

□ □


किल्ले राजगड ता. वेल्हे, जि. पुणे.
चोरवाट
कोळेश्वरी बुरुज व देवी
चोर दरवाजा
डुबा
टेहळणी बुरुज व चोरवाट
सदर
ळ- हनुमान मंदिर
सु वे ळा मा ची
सं जी व नी मा ची
चिलखती बुरुज
आळू दरवाजा
टेहळणी बुरुज
चोर दरवाजा
टेहळणी बुरुज
तिहेरी बुरुज
ह- सदर
अ-बालेकिल्ल्याचा दरवाजा
ब-जननीचे मंदिर
क- राजवाडा
ड-ब्रह्मर्षी मंदिर
बाले किल्ला
इ- बाजारपेठ
फ- शिबंदी
ग- दारु कोठार
गुंजवणे दरवाजा
गुंजवणे गावाकडे
पाण्याची टाकी
पाली दरवाजा
पाली गावाकडे
१-पद्मावती तलाव
२-रामेश्वर मंदिर
३-राजवाडा
४-अंबारखाना
५-चोध्यांच्या पागा
६-सदर
७-पद्मावती मंदिर
८- कचेरी
चोर दरवाजा
प द्मा व ती मा ची



पद्मावती तळे



संजीवनी माचीची तटबंदी